दैनिक **वादळ वार्ता**

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ●मंगळवार दि.२६ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ११ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 26 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 11 ● Pages 4 ● Rate 4 Rs



**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.


# सरकार कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

## आम्ही दिलेला शब्द पाळतो; लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही

**संगमनेर (वृत्तसंस्था)**–लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही. कोणत्याही परिस्थितीत राज्य सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी करेल, असे उपमुख्यमंत्री एकनाथशिंदे यांनी सांगितले.आमदार अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन व महायुतीच्या मेळाव्यात मार्गदर्शनकरताना ते बोलत होते. आमदारअमोल खताळ, आमदार विठ्ठलरावलंघे, आनंद भोसले, माजी आमदारभाऊसाहेब कांबळे, माजी आमदारभानुदास मुरकुटे, ज्योती वाघमारेआदी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले,शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधली म्हणून या एकनाथ शिंदेने यांच्या सत्तेला हुलकावणी दिली. महाराष्ट्रात लोकाभिमुख कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहोचवल्या. महाविकास आघाडीवर टीका करताना ते म्हणाले वीज बिल माफ करू, असे आश्वासन त्यांनी दिले होते. मात्र आमची प्रिंटिंग मिस्टेक झाली. आम्ही दिलेला शब्द पाळतो सर्वसामान्यांसाठीच्या सर्व योजना टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार आहोत.आमदार खताळ यांच्या बाबत ते म्हणाले, तुमचे आमदार संधीचे सोने करणारे आहेत. ते संजय गांधी योजनेचे अध्यक्ष झाले आणि त्यांनी निराधाराला आधार दिला. तुमचा संगमनेरचा आमदार आता दिल्लीत माहिती झाला. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला महाराष्ट्रात यश मिळाले तर ईव्हीएम चांगले होते. आता मतचोरीच्या आरोपाचे राजकारण करत आहेत. त्यांच्या टिकेला कामातून उत्तर देऊ.पहलगामच्या हल्ला झाला, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून अतिरेक्यांचा खात्मा केला हे आपल्याला माहिती आहे. यातही काँग्रेसने राजकारण केले आणि सैनिकांच्या कामगिरीवर संशय निर्माण केला. महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा आम्ही आदर करतो त्यांच्या पाठीशी आम्ही आहोत. वारकऱ्यांचा अपमान करण्याचे काम कोणी करत असेल तर ते सहन करणार नसल्याचे ते म्हणाले.आमदार अमोल खताळ म्हणाले, संगमनेरची प्रगती लोकांनी स्वतःच्या हिमतीवर केली आहे. महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या केसालाही कोणी धक्का लावू शकणार नाही. यापुढे दहशत खपून घेणार नाही. येणाऱ्या निवडणुकांमध्ये सर्वत्र भगवा फडकवणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आ. सत्यजित तांबे यांच्यावरही टीका करताना ते म्हणाले. तुम्ही सत्ताधारी पक्षाचे आमदार आहात असे सांगता. सत्ताधारी पक्षाचे आमदार व्हायला पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवावी लागते. सूत्रसंचालन स्मिता गुणे यांनी केले.

खताळ यांना तुम्ही निवडून दिले ४० वर्षांची सत्ता तुम्ही उलथवून टाकलीतुमचे आभार मानण्यासाठी मी येथे आलो आहे. खताळ जरी जायंट किलरठरले असेल तरी खरे जायंट किलर तुम्ही आहात. संगमनेरला तात्काळ १००बेडचे रुग्णालय, एमआयडीसी, आरटीओ कार्यालय, जलशुद्धीकरणप्रकल्प, छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आदी आमदारखताळ यांनी केलेल्या मागण्यांबाबत शासन स्तरावर प्रक्रिया सुरू करण्यातअसल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर केले.




# खा.बजरंग सोनवणेंच्या हस्ते आज 'मांजरा'तील जलपूजन

## शेतकऱ्यांची राहणार उपस्थिती, दोन दरवाज्यातून पाण्याचा विसर्ग

**केज । प्रतिनिधी**

केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, कळंब या शहरासह ६१ गावांची तहान भागवणारे व मांजरा पट्ट्यातील पाच तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण १०० टक्के भरले आहे.आज सकाळी दहा वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते धरणातील पाण्याचे जलपुजन करण्यात येणार आहे.लातूर शहर, लातूर औद्योगिक वसाहत, केज, अंबाजोगाई, धारूर, कळंब या शहरासह ६१ गावे मांजरा धरणातील पाणी पुरवठ्यावर निर्भर असतात. मांजरा धरण पिण्याचे पाण्याबरोबर शेती पिकांना लागणाऱ्या पाण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्या अंतर्गत बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील ७३ गावातील १८ हजार २२३ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येते. डावा कालवा ९० कि.मी. अंतराचा आहे. त्यातून १०,५५९ हेक्टर शेती तर, उजवा कालवा ७८ कि.मी.चा असून त्याअंतर्गत ७६६५ हेक्टर शेती सिंचनाखाली येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सरासरी १८५ दलघमी पाण्याचा वापर होते. याशिवाय केज व कळंब तालुक्यातील २७ गावातील शेतकऱ्यांना मांजरा धरणाच्या बॅकवॉटर पाण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होतो. तसेच धरणातील पाण्यावर बिगर सिंचन योजना सुध्दा २१ आहेत तर पिण्याच्या पाणी योजना १६ कार्यरत आहेत. नागरिकांना पिण्यासाठी सरासरी ६१.९३ दलघमी एवढे पाणी आरक्षित ठेवण्यात येते. पाण्याच्या सिंचनाच्या व औद्योगिक दृष्ट्या मांजरा धरण अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मागील काही दिवसांपुर्वी धरण पुर्णपणे भरले होते. यानंतर सहा दरवाजे उघडून पाणी सोडण्यात आले होते. आता चार दरवाजे बंद करण्यात आले असून दोन दरवाज्यातून ४९.४८ क्यूसेक्सने मांजरा नदी पात्र पाण्याचा विसर्ग सुरू आहे. मांजरा धरणामुळे केज तालुक्यातील मोठ्या प्रमाणात हरीतक्रांती झालेली असून आज खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते जलपुजन होत आहे.




**मांजरा धरणाची संक्षिप्त माहिती**

–प्रकल्पीय क्षेत्र ४५ चौरस किमी.
–पूर्ण संचयी पाणीपातळी ६४२.३७ मीटर
–प्रकल्पीय एकूण पाणीसाठवण क्षमता २२४.०९३ दलघमी.
–मृत पाणीसाठा ४७.१३० दलघमी.
–उपयुक्त (जिवंत) पाणीसाठा क्षमता १७६.९६३ दलघमी.

# भीमवाणी, वामन गाणी व महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा-प्रा.डॉ.संजय कांबळे

**बीड । प्रतिनिधी**

नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने आयोजित भीमवाणी, वामन गाणी कार्यक्रम व महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा गुरुवार, दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी सायं. ६ वा. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे भव्यदिव्य पद्धतीने पार पडणार असून या सोहळ्यास बीड शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा.डॉ.संजय कांबळे यांनी केले आहे.महाकवी वामनदादा कर्डक जयंतीनिमित्त नालंदा फाउंडेशनतर्फे दरवर्षी दिला जाणारा राज्यस्तरीय पुरस्कार यावर्षी चौथ्या वर्षात पदार्पण करत असून यंदाचा पुरस्कार प्रख्यात भीमगीत गायिका 'भीमकोकिळा' सुषमादेवी मोटघरे यांना जाहीर झाला आहे. पुरस्काराचे स्वरूप रु. २५,०००/- रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा.प्रदीप रोडे (अध्यक्ष, नालंदा फाउंडेशन, बीड) भूषवणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री.उमेश सोनवणे (उपआयुक्त, जात पडताळणी समिती, बीड), मा.श्री.डी.बी.क्षीरसागर (सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, बीड), मा.संदीप उपरे (राज्याध्यक्ष, सत्यशोधक ओबीसी परिषद, महाराष्ट्र राज्य) व मा.प्रा.दीपक जमदाडे (संगीत विभाग प्रमुख, सौ.के.एस.के. महाविद्यालय, बीड)हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच आयु. गुलाबराव



भोले व कॅप्टन राजाभाऊ आठवले यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे.या सोहळ्यात सुषमादेवी यांच्या मुख्य सन्मानसोबतच आयु.धोंडीराम रोडे, आयु.छायाबाई कोकाटे व आयु.बळीराम उपाडे यांचा मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन विशेष सन्मान करण्यात येणार आहे. तसेच भीमवाणी, वामन गाणी कार्यक्रमात विविध गायक-कलाकार आपल्या सुरेल आवाजातून वामनदादांच्या जाज्वल्य विचारांना सुरांची साथ देणार आहेत.बीड शहर व परिसरातील नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक प्रा.राम गायकवाड, प्रा.शरद वंजारे, प्रा.डॉ.संजय कांबळे, प्रा.अंकुश कोरडे व सिद्धार्थ वाघमारे यांनी केले आहे.

# अन्यायकारक अधिभार व वाढीव विजदेयक आकारून घरगुती विजग्राहकांची लुट-गिराम

## विधुतवितरण अभियंत्यास शिवसेनेचे निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील विज ग्राहकांवर अन्यायकारक अधिभार व वाढीव विज रक्कम लादून हे भाजप शासित सरकार सामान्य घरगुती विज ग्राहकांची लुट करत असल्याचे निदर्शनास आल्या नंतर आज या विषयी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी महाराष्ट्र राज्य विधुत वितरण कंपनी च्या अभियंत्यास निवेदन दिले.



यावेळी जिल्हाप्रमुख मीराताई नवले, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महुवले, जिल्हा संघटक संजय महाद्वार, माजी .प .स नवनाथ प्रभाळे ,विधानसभा प्रमुख सुशील भैया पिंगळे, हनुमान काशिद ,कामगार सेना रवी वाघमारे,, गणेश लोणकर ,शरद पवार सुनील जगताप , रमेश नवले, रंगनाथ पैठणकर , बलराज कोटुळे , विशाल तांबे इतर शिवसैनिक उपस्थित होते..









# भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघटना आज महत्वपूर्ण बैठक

**बीड । प्रतिनिधी**

पत्रकारांच्या विविध मागण्या, अडचणी, आणि धोरणात्मक पावले उचलण्यासाठी, तसेच संघटनात्मक बांधणी आणि पत्रकारांवर होत असलेल्या अन्याय, अत्याचार व हल्ल्यांवर चर्चा करण्यासाठी बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे २६ ऑगस्ट रोजी दुपारी एक वा. महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघटना प्रदीप कुलकर्णी प्रदेश अध्यक्ष यांच्या आदेशाने या बैठकीला मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघटना मराठवाडा विभागीय अध्यक्ष आत्मलिंग शेटे जिल्हाध्यक्ष दिगंबर सोळंके, जिल्हा सरचिटणीस बालाजी जगतकर व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.ह्या बैठकीमध्ये जिल्हा कार्यकारणी विस्तार आणि विविध पदांवर नियुक्ती दिली जाणार असून, पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या पत्रकार, युट्यूब पत्रकार, संपादक, आणि वृत्तपत्र क्षेत्राशी निगडित पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.ही बैठक पत्रकारांच्या एकजुटीसाठी व त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी महत्त्वाची बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

संपादकीय

# येवा कोकण तुमचाच आसा!



कोकणामध्ये गणेशोत्सव, शिमगोत्सव हे सण रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये उत्साहाने साजरे केले जातात. नोकरी–व्यवसायाच्या निमित्ताने कोकणातील गावाबाहेर शहरांमध्ये असणारा कोकणवासीय गणेशोत्सव आणि शिमगोत्सव या दोन सणांच्या निमित्ताने आपल्या गावात येतात. दिवाळीच्या सणाला आपल्या गावाला येणाऱ्यांची संख्या फार कमी आहे. मग कोकणातील ग्रामदेवतांचे उत्सव, जत्रोत्सव याला ही सर्व मंडळी गावात येतात; परंतु कोकणात सार्वजनिक गणेशोत्सवापेक्षा घरोघरी गणेशमूर्तीचे पूजन केले जाते.त्यामुळेच कोकणातील इतरवेळी बंद असलेली घरे या गणेशोत्सवाच्या निमित्ताने उघडलेली दिसतात. कोकणातील प्रत्येक गावातील वातावरणात उत्साह असतो. निसर्गातील हिरवेपणा मनाला निश्चितच आल्हाददायक वाटत राहते. सगळीकडे हिरवेगार निसर्गाने एक वेगळं वातावरण तयार झालेलं असत. गणपती उत्सवात साऱ्या वेदना, दु:ख, तंटे, बखेडे विसरून कोकणातील सर्वसामान्य शेतकऱ्यांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वजण गणेशाच्या आगमनाची वाट पाहत असतात.प्रत्येक घरात मुंबई, पुणे तसेच नोकरीनिमित्त अन्य भागांत राहिलेला प्रत्येकजण परतलेला असतो. त्यांच्या येण्याने गावात राहणारी वृद्ध आपल्या लेकरांच्या ओढीने भावनिकदृष्ट्या फार अस्वस्थ असतात. गावातील वृद्धांच्या नजरा मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर अशा शहरांमध्ये असणाऱ्या आपल्या लेकरांच्या येण्याने आणि ज्याची वर्षभर गणपती कधी येणार म्हणून वाट पाहणारे सारेच फार उत्साही आनंदी असतात. यामुळे कोकणात गणपती उत्सवाला प्रत्येकाची पावले रेल्वे, एस. टी. किंवा स्वत:च्या वाहनानेदेखील आपल्या घरी परतलेली असतात. यावर्षीही महाराष्ट्र सरकारने कोकणात स्वत:च्या वाहनाने येणाऱ्यांना टोलमाफी केली आहे.दीड–दोन हजार मुंबई ते कोकणप्रवासात टोल भरावा लागत होता. त्या पार्श्वभूमीवर कोकणात या गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या गणेशभक्त प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. कोकणात येणारा गणेशभक्त यावर्षी देखील मुंबई–गोवा महामार्गाने सुखकर प्रवास करत येऊ शकणार नाही. मुंबई–गोवा महामार्गावर आजही रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात काही भागांत महामार्गाची काम अपूर्ण आहेत. मात्र, तरीही गतवर्षीपेक्षा यावर्षी अधिक चांगली स्थिती आहे.कोकणातील मुंबई–गोवा महामार्गाचा प्रवास कोकणवासीय चाकरमान्यांना पुढच्यावर्षीपर्यंत तरी चांगला होईल अशी अपेक्षा करायला काहीच हरकत नाही. यावर्षीच्या गणेशोत्सवासाठीची टोलमाफी २३ ऑगस्ट ते २८ सप्टेंबर या कालावधीमध्ये मुंबई–बंगळूरु राष्ट्रीय महामार्ग, मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्यांसाठी वाहनांना, एस. टी बसेसना टोलमाफी देण्यात येणार आहे. 'गणेशोत्सव २०२५–कोकण दर्शन' या नावाने हा पास वाहनांना देण्यात येणार आहे.गणेशोत्सव २०२५–कोकण दर्शनचे पास प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस व वाहतूक विभागाकडे हे कोकण दर्शनचे पास उपलब्ध असणार आहे. कोकणातून मुंबईच्या परतीच्या प्रवासासाठीही हाच पास ग्राह्य धरला जाणार आहे. या पासविषयी मुंबईकर चाकरमानी जनतेला माहिती व्हावी यासाठी राज्यसरकारने संबंधित विभागानाही जास्तीत–जास्त लोकांपर्यंत ही माहिती पोहोचवावी अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाच्या टोलमाफीच्या या निर्णयाने कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांना सोसावा लागणारा भुर्दंड आता सोसावा लागणार नाही. यामुळे निश्चितच शासनानेही कोकणातील गणेशोत्सवाचा उत्साहदेखील द्विगुणित केला आहे. असेच म्हणावे लागेल. पाऊसधारांनी धरणे तुडुंब...!कोकणात मागील आठवडाभर ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा सर्वच जिल्ह्यांमध्ये पाऊस कोसळत होता. काही भागांत पाऊस सतत लागतच होता. यामुळे कोकणातील सर्व जिल्ह्यांमध्ये आजच्या घडीला भातशेतीच जरी नुकसान झालय असं वाटत नसल तरीही त्याचे नेमकेपणाने होणारे परिणाम नजिकच्या काळात पुढे येतील. बऱ्याच गावातून ढगफुटी सदृश्य पाऊस कोसळत होता. यामुळे साहजिकच ओहोळ, नदी, नाले तुडुंब भरून वाहत होते. अनेक नद्यांनी धोक्याची पातळी गाठली.सिंधुदुर्गात तर काही नद्यांचे गाळ काढण्यात आल्याने साहजिकच एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाऊस कोसळूनही गावातून पाणी भरण्याचे प्रकार फार ठिकाणी घडले नाही. दरवर्षी ज्या भागातून पाणी भरते त्या भागातही या पावसाच्या पाण्याचा परिणाम जाणवला नाही. कोकणातील कुंडलीका, अंबा, सावित्री, पाताळगंगा, जगबुडी, नद्यांनी यावेळी इशारा पातळी ओलांडली आहे. कोकणात एकूण १७३ लहान–मोठी धरणे आहेत. या धरणांमध्ये ११८.९३ टक्के पाणीसाठी उपलब्ध आहे.ही सर्व धरणेही ९२ टक्के इतकी पाण्याने भरली आहेत. अलीकडे हवामान खात्याचे अंदाज बहुतांशीवेळा अचूक येत आहेत. यामुळे कोणत्या भागात पाऊस पडणार आहे याची माहिती ग्रामस्थांना होते त्यामुळे शहरी भागातील नागरीक व ग्रामस्थही सतर्क असतात. काळजी घेतात. गत आठवडाभर कोसळणारा पाऊस आणि अगदी दोन दिवसांवर येणारा गणपती उत्सव यामुळे या कोसळणाऱ्या पावसातच गणेशोत्सव साजरा करावा लागणार की पाऊस थोडीफार विश्रांती घेईल याच्या 'गजाली' मात्र मालवणी मुलखात होऊ लागल्या आहेत.कोकण रेल्वेची कार रो–रो आली...! कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या कोकणवासीयांना कोकण रेल्वेने कोलाड ते नांदगाव ता. कणकवली, वेर्णा गोवा अशी कार रो–रो सेवा सुरू केली आहे. कोकण रेल्वे मार्गावर पहिली कार रो–रो सेवा शनिवारी २३ ऑगस्टला कोलाड येथून कोकणात रवाना झाली. रविवारी सकाळी नांदगाव रेल्वे स्टेशनवर कार आणि प्रवासी उतरले. आपल्या कारने आपल्या गावी गणपतीला पोहोचलेही.कोकण रेल्वेच्या या पहिल्या कार रो–रो सेवेला फार कमी प्रतिसाद मिळाला आहे. कोकण रेल्वेने जरी ही कार रो–रो सेवा सुरू केली असली तरीही मुंबईकर कोकणात जाणाऱ्यांना ही कार रो–रो सेवा सुरू होईल की नाही. अशी शंका वाटत होती. परंतु कोकण रेल्वेने गणेशभक्तांना कोकणात जाण्यासाठी एक मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. भविष्यात जर या रेल्वे कार रो–रो सेवेने जायचा निर्णय मुंबईकर कोकणवासीयांनी घेतला, तर निश्चितच मुंबई ते कोकण ही कार रो–रो सेवा उपयुक्त ठरेल. यामुळे मुंबई–गोवा महामार्गावरील त्रासही वाचू शकतो. नजिकच्या काळात प्रतिसाद कसा मिळतोय ते समजून येईल.

# आगार प्रमुख डोके यांच्या त्रासामुळे मागासवर्गीय एसटी महिला कर्मचाऱ्याचा जीव धोक्यात

**बीड । प्रतिनिधी**

बीड मध्यवर्ती बसस्थानकात घडलेली धक्कादायक घटना–मागासवर्गीय समाजातील एसटी महिला कर्मचारी स्वाती कांबळे यांचा जीव कार्यालयीन त्रासामुळे थोडक्यात वाचला. पदोन्नती मिळून तीन महिने उलटून गेले तरी चार्ज न देणे, सततची टाळाटाळ, त्यावर जातीवाचक अपमानास्पद शब्दप्रयोग या सर्वामुळे अखेर कांबळे कार्यालयातच बेशुद्ध पडल्या.मिळालेल्या माहितीनुसार, स्वाती कांबळे या तीन महिन्यांपूर्वी वाहक पदावरून लिपिक पदावर पदोन्नत झाल्या. मात्र आजतागायत त्यांना अधिकृत चार्ज देण्यात आलेला नाही. त्या रोज डेपो कार्यालयात हजेरी लावत होत्या, चार्जसाठी मागणी करत होत्या, पण वरिष्ठांकडून दुर्लक्षच होत होते. सततच्या अन्यायामुळे त्यांचा मानसिक ताण वाढत गेला आणि त्यामुळे रक्तदाबाचाही त्रास वाढला.

२३ ऑगस्ट रोजी त्या कार्यालयात गेल्यावर आगार प्रमुख डोके व इतर संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांना जातीवाचक अपशब्द बोलत अपमानित केल्याचा आरोप आहे.



यामुळे झालेल्या धक्क्याने स्वाती कांबळे यांचा बीपी लो होऊन त्या कार्यालयातच कोसळल्या. धक्कादायक बाब म्हणजे, त्या बेशुद्ध पडल्या असताना कार्यालयातील एकाही अधिकाऱ्याने वा कर्मचाऱ्याने मदत केली नाही. नंतर काही स्थानिकांनी पुढाकार घेत त्यांना तातडीने सरकारी दवाखान्यात दाखल केले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.या प्रकरणामुळे संपूर्ण एसटी विभागात संतापाची लाट उसळली आहे. आगार प्रमुख डोके यांच्यासह संबंधित कर्मचाऱ्यांवर अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार (ट्रॉसिटी कायदा) गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरत आहे. महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रशासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## एस.टी. महामंडळातील जातीयवादाचा कळस!

**एस.टी. महामंडळामध्ये महिला कर्मचाऱ्यांना नाईट ड्युटी दिली जात नसते, मात्र आगार प्रमुख यांच्या जातीयवादी मानसिकतेमुळे वंदना पंडित या मागासवर्गीय महिला कर्मचाऱ्यास जबरदस्तीने नाईट ड्युटी देण्यात आली. या प्रकारातून त्यांना जाणीवपूर्वक जातीय दृष्टिकोनातून त्रास दिला गेला.याचप्रमाणे श्वेता कांबळे या मागासवर्गीय महिला कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार विभागीय कार्यालयामध्ये पदोन्नती मिळणे अपेक्षित असताना, गेल्या तीन महिन्यांपासून त्यांना कसल्याही प्रकारचा पदभार न देता मानसिक छळ करण्यात आला. चौकशीसाठी त्या संबंधित अधिकाऱ्यांकडे गेल्या असता त्यांनाही जातीयवादी अपशब्दांचा सामना करावा लागला, परिणामी त्या कार्यालयातच बेशुद्ध पडल्या.ही घटना अत्यंत धक्कादायक व दुर्दैवी असून, संबंधित अधिकाऱ्यांवर अत्याचार प्रतिबंधक कायदा (ट्रॉसिटी क्ट) अंतर्गत गुन्हा दाखल होईपर्यंत आम्ही ठामपणे पाठपुरावा करत राहणार आहोत.**

**अजय सरवदे**
**जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड**

# एकमेकांत स्नेहबंध निर्माण व्हावेत : तान्हा पोळा

नागपूरकर भोसल्यांच्या शासनकाळात हा सण सुरू झाला. विदर्भात बहुधा सर्व ठिकाणी हा सण साजरा होतो. १७८९ मध्ये दुसरे श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (द्वितीय) यांनी हा उत्सव सुरू केला. त्यांनी लहान मुलांना बैलांचे महत्त्व कळावे म्हणून हा उपक्रम हाती घेतला होता. राजे रघुजी महाराज भोंसले (द्वितीय) यांनी लाकडी बैल तयार करून सर्व लहान मुलांना वाटले. जिवंत बैलांप्रमाणे त्या बैलांना सजविण्यात आले. आंब्याचे तोरण लावून जिलेबी, फळे, चॉकलेट, बिस्कीट पुडे अशा विविध वस्तू तेथे बांधण्यात आल्या. बैलाजवळ मुलांना उभे करून बैलांची पूजा केली जायची. पूजा संपल्यानंतर तोरण तोडून पोळा फोडून वाजत गाजत हनुमान खिडकीचे दर्शन घेऊन हनुमानाला नारळ फोडून परत आल्यावर मुलांना खाऊ, पैसे, वाटले जायचे. ही परंपरा सातत्याने सुरु होती. आजही नागपूरातील महाल परिसरात ती पहायला मिळते.नागपूरसह विदर्भातील जवळपास सगळ्याच जिल्ह्यांमध्ये तान्हापोळ्या निमित्त सगळ्याच वयोगटातील लोक लाकडी बैल घेऊन त्याची पुजा करून हा सन आनंदाने साजरा करतात. त्यातच नागपुरातील सनियर भोसला पॅलेसमधील तब्बल आठ फुट उंचीचा लाकडी बैल सर्वांचे लक्ष वेधून घेतो. नागपुरातील या सणाला व लाकडी बैलांच्या (तान्हा) पोळ्याला तब्बल २३५ वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्रात सर्वत्र पोळा हा बैलांचा सण म्हणून साजरा होतो. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे तान्हा पोळ्याला शहरातील अनेक भागात लाकडी बैलांचा पोळा भरतो. विदर्भ वगळता कुठेच हा पोळा साजरा होत नाही.

लहान मुले मोठे बैल नेऊ शकत नाहीत. ते त्यांना आवरू पण शकत नाहीत. म्हणून त्यांच्या हौस–मजेसाठी 'तान्हा पोळा' साजरा करण्यात येतो. त्या दिवशी लहान मुले लाकडापासून तयार केलेला बैल घेऊन खऱ्या बैलाप्रमाणेच या लाकडाच्या बैलाचा तान्हा पोळा साजरा करतात. तान्हा पोळा बहुतेक लहान मुलांच्या विरंगुळ्यासाठी साजरा करण्याची प्रथा आहे. बैल पोळ्याच्या पाडव्याला नागपूरसह पूर्व विदर्भात तान्हा पोळा उत्साहात साजरा केल्या जातो. ही ऐतिहासिक परंपरा असलेल्या या पोळ्याची सुरूवात राजे रघुजी भोसले यांनी केली होती. तेव्हा पासुन तान्हा पोळा साजरा करतात. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा तान्हा पोळा हा शहराचा अनोखा सण विदर्भाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा पुरावा आहे. या दिवशी लहान मुले आपआपल्या लाकडी बैलाला सजवतात. त्यानंतर एखाद्या जवळच्या मंदिरात किंवा मैदानावर हा तान्हा पोळा भरवल्या जातो. तो परिसर फुगे, तोरण, पताका लावुन सजविल्या जातो. प्रसंगी महादेवाची गाणी वाजविली जातात. नंदी बैल भगवान महादेवाचे वाहन असल्या कारणाने महादेवाच्या नावाचा जयजयकार केल्या जातो. त्यानंतर मुलांना काकडी व खोबऱ्याचा प्रसाद वाटप केल्या जाते आणि पोळा फुटला असे जाहीर केल्या जाते. गेल्या काही वर्षांपासुन या पोळ्याला संस्कृती व स्पर्धा याची झालर लागली आहे. अनेक पालक आपल्या मुलाला वेगवेगळ्या वेशभुषांमध्ये सजवुन आणतात. पोळा फुटायच्या आधी या सगळ्या छोट्या मुलांचे वेशभुषा निरीक्षण केले जाते. तसेच त्यांनी सजावुन आणलेल्या बैलाचे निरीक्षण केले जाते. पोळा फुटल्यानंतर उत्तम वेशभुषा व बैलाची उत्तम सजावट केलेल्या मुलांना क्रमांका प्रमाणे नंबर देऊन, त्यांना योग्य ते पारितोषिक दिल्या जाते. त्याचप्रमाणे सगळ्याच मुलांना काहीनाकाही छोटी भेटवस्तु दिली जाते. त्यानंतर ही मुले घरी येतात. ज्याप्रमाणे मोठ्या बैलांची सर्व प्रथम घरी पुजा केल्या जाते. त्याचप्रमाणे या लाकडी बैलांच्या पूजेला देखील घरुन सुरुवात होते. त्यानंतर ही मुले आपल्या शेजारी व नातेवाईकांकडे जाऊन 'बोजारा' जमा करतात, म्हणजे त्यांना पैसे किंवा भेटवस्तु दिल्या जाते. लहान मुलांना देखील शेतीचे व त्यात राबराब राबणाऱ्या बैलांचे महत्व कळावे. आपल्या कृषीप्रधान संस्कृती विषयी ते कृतज्ञ राहावे, यासाठी कदाचित तान्हा पोळा हा सण साजरा करण्याची प्रथा विदर्भात रुजली असावी. यामुळे लहान मुलांमध्येही बैल या पशुधनाबाबत माहिती होऊन महाराष्ट्रीयन संस्कृती जपल्या जाते. सर्वांना तान्हा पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा !

**–प्रविण बागडे**
**नागपूर**
**९९२३६२०९१९**

# ढवण यांच्या आंदोलनाला पाठिंब्यासाठी निघोज बंद व रस्ता रोको

**अहिल्यानगर** । प्रतिनिधी

शेतकऱ्यां ची कर्ज माफी , कांदा भाव वाढ , कांदा निर्यातबंदी मागे घ्यावी , या आणि इतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी गेल्या सलग ४ दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेले युवा शेतकरी नेते व आपली माती , आपली माणसं या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष रूपेश ढवण यांनी उभारलेल्या शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी निघोज येथे आज रविवार दि . २४ रोजी संपूर्ण गाव बंद राहणार असून सकाळी १० वाजता बसस्थानक परिसरात मुख्य रस्त्यावर वारकरी , शेतकरी , व्यापारी , ग्रामस्थ यांच्या वतीने भव्य रस्ता रोको आयोजित करण्यात आले आहे .

युवा शेतकरी नेता रुपेश ढवण यांनी नुकतेच २० दिवसांपूर्वी शेतकऱ्यांच्या च प्रश्नांवर ४ दिवस अन्न त्याग आंदोलन केले होते , त्यावेळी त्यांना राज्यभरातून मोठा पाठिंबा मिळाला होता , त्यांनी मांडलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाला २० दिवसांची मुदत दिली होती व हे प्रश्न मार्गी न लागल्यास पुन्हा आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा ही दिला



होता , त्यासंदर्भात त्यांना राजकीय नेत्यांनी शब्द ही दिला , पण या २० दिवसांमध्ये शेतकऱ्यांचे एक ही प्रश्न मार्गी लागला नाही , त्या निषेधार्थ रुपेश ढवण यांनी गुरुवार दि . २० रोजी ग्रामदैवत श्री मळगंगा देवीचे दर्शन घेत आमरण उपोषणाला सुरुवात केली , आज शनिवारी या उपोषणाचा ४ था दिवस असून या कालावधीत पोलीस प्रशासन वगळता , पारनेर तालुका वा नगर जिल्हा पातळीवरील एका ही शासकीय अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नाही , वा साधी विचारपूस ही केली नाही . निघोज ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी उपोषण कर्ते रुपेश ढवण यांची आरोग्य तपासणी केली असता , त्यांचा बी पी वाढला , तर वजन घटले असून थकवा जाणवू लागला आहे . त्यांच्या आरोग्यावर परिणाम जाणवू लागला आहे .

राज्यात सत्तेवर असलेल्या सध्याच्या महायुती शासनाने विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांची कर्ज माफी , कांदा भाव वाढ , कांदा निर्यात खुली करणार , शेती मालाला हमी भाव , या व इतर प्रश्न सोडवण्याचा दिलेला शब्द , सत्तेवर येताच दुर्लक्ष केले . त्यात निसर्गाने गरज नसताना उन्हाळ्यात भरपूर पाऊस दिला . आता पिकांना पावसाची गरज असतानाही पाऊस नाही , पिके सुकून गेली , अक्षरशः पिके करपली आहेत . त्यात कांद्याला भाव नाही , परिणामी बाजार पेठेवर त्याचा फार मोठा परिणाम झाल्याने व्यवसाय ठप्प झाले आहेत , त्यांचा लहान मोठ्या व्यापारी वर्गाला मोठा फटका बसला आहे . आर्थिक उलाढाल मंदावली आहे . याला कारणीभूत शासनाचे चुकीचे धोरण ठरले आहे . यामुळे निघोज सारख्या ग्रामीण भागातून रुपेश ढवण सारख्या शेतकरी पुत्राने ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा आदर्श घेत , अहिंसात्मक मार्गाने आमरण उपोषणाचे हत्यार उपसत हे जनआंदोलन उभे केले आहे . या आंदोलनाच्या उद्या च्या ५ व्या दिवशी पाठिंबा देण्यासाठी जनतेतून उत्स्फुर्त प्रतिक्रिया उमटत उद्या रविवार दि . २४ रोजी पारनेर तालुक्यातील सर्वांत मोठी बाजारपेठ असलेले निघोज गाव बंद ठेवत , बस स्थानक परिसरातील मुख्य रस्त्यावर भव्य रस्ता रोको करण्यात येणार आहे .

# १४ राज्यांना आयएमडीचा हाय अलर्ट

काही दिवसांपूर्वी देशासह राज्याला पावसानं झोडपून काढलं होतं. पावसानं राज्यात कहर केला, शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं. दरम्यान आता पुन्हा एकदा भारतीय हवामान खात्याकडून जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाच्या नव्या अंदाजानं चिंता वाढली आहे. पुन्हा एकदा कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून, देशासह राज्यात अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागानं दिलेल्या इशाऱ्यानुसार २९ ऑगस्टपर्यंत अनेक राज्यांमध्ये पावसाची शक्यता आहे.हवामान विभागाच्या नव्या अंदाजानुसार कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे पुढील दोन दिवसांमध्ये झारखंड, राजस्थान, ओडिशा आणि बिहार या राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर २८ आणि २९ ऑगस्ट रोजी मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्रासह सिक्कीम राज्यात जोरदार पावसाचा अंदाज आहे. पंजाब, हरियाणा दिल्ली, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू काश्मीरमध्ये देखील पावसाचा हाय अलर्ट देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचं आवाहन करण्यात आलं आहे. दरम्यान कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात देखील पावसाचा जोर वाढणार आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. हा कमी दाबाचा पट्टा राजस्थान आणि पंजाबच्या आसपास सक्रिय असणार आहे. त्यामुळे पुन्हा एकदा २५ ऑगस्टपासून ते २९ ऑगस्टपर्यंत राज्यात पावसाचा जोर वाढणार आहे. महाराष्ट्रात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात या कालावधीमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पुढील पाच दिवस राज्यात पावसाचा जोर वाढणार आहे.१७ ऑगस्टपासून ते २१ ऑगस्टपर्यंत राज्यात अतिमुसळधार पाऊस झाला, या पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं. अनेकांच्या घरात पाणी घुसलं, पुराचा मोठा फटका लोकांना बसला. शेतांमध्ये पाणी साचल्यानं पिकांचं मोठं नुकसान झालं असून, शेतकरी हवालदिल झाले आहेत. दरम्यान आता पुन्हा एकदा हवामान विभागाकडून पावसाचा इशारा देण्यात आल्यानं चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सतर्कतेचं आवाहन करण्यात आलं आहे.

# केजमध्ये पप्पू कागदे यांनी फुंकले स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे रणशिंग

**केज । प्रतिनिधी**

निळ्या झेंड्याखाली शोषित पीडित लोकांची सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी द्यायला हवी.केंद्रिय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली चळवळीत काम करणारा कार्यकर्ता हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी बांधिलकी जपणारा कार्यकर्ता आहे.म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत दीपक कांबळे यांच्या उमेदवारीवर पप्पू कागदे यांनी जणू शिक्कामोर्तब करून स्थानिक स्वराज्य संस्थेचे रणशिंग फुंकले. तसेच यावेळी मेळाव्याचे संयोजक दीपक कांबळें यांनी यावेळी सांगितले की, केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि पप्पु कागदे यांच्या नेतृत्वा खाली बहुजन समाजाला सोबत घेऊन सामाजिक अभिसरण सुदृढ करण्याची प्रक्रिया आणि सामाजिक चळवळ गतिमान करणार आहे.कार्यकर्ते सोबत घेऊन आम्ही त्यांच्या मूलभूत हक्कासाठी लढत आहोत.

दि.२५ ऑगस्ट रोजी केज रिपाइंचे वतीने दीपक कांबळे यांनी केज येथील मुक्ताई लॉन्स येथे संकल्प मेळावा आयोजित केला होता.या मेळाव्याला मराठवाडा संघटक मजहर खान, मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे,जिल्हा सल्लागार उत्तम मस्के, प्रभाकर चांदणे,दशरथ सोनवणे,कपिल कागदे, रवींद्र जोगदंड,विकास मस्के,ईश्वर सोनवणे, राहुल सरवदे यांची प्रमुख उपस्थिती होती.




या संकल्प मेळाव्याला उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधताना पप्पू कागदे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आणि जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुकीच्या माध्यमातून उपेक्षित आणि सामन्यांच्या कामासाठी अहोरात्र मदतीसाठी रस्त्यावर असलेल्या कार्यकर्त्यांना संधी मिळावी.तसेच निळ्या झेंड्याच्या माध्यमातून सेवा करण्याची अशा कार्यकर्त्यांना समाजाने संधी देण्याचे आवाहन करीत अप्रत्यक्षरित्या त्यांनी दीपक कांबळे यांच्या जिल्हा परिषदे च्या उमेदवारीवर शिक्कामोर्तंब करून एका अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे.तसेच पुढे बोलताना कागदे यांनी रिपाइं चळवळीच्या माध्यमातून आणि रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील ५ हजार एकर जमीन ही भूमिहीन अतिक्रमण धारकांना मिळवून दिली असून ३ हजार भूमिहीनांना त्याच्या सात बारा मिळवून देण्याचे काम केले आहे तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी कार्यकर्ते काम करीत असतात. रामदास आठवले यांनी राज्याचे समाजकल्याण मंत्री असताना त्यांनी मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न सोडविला.त्यासाठी त्यांनी त्यांचे मंत्रीपद देखील पणाला लावले. त्यामुळे तत्कालीन सरकारला विद्यापीठाचे नामांतर करण्याचा निर्णय घ्यावा लागला. रिपाइंच्या माध्यमातून दलीत,शोषित,पीडित समाजाला न्याय देण्याचे काम कार्यकर्ते निस्वार्थीपणे काम करीत असल्याचा उल्लेख केला.यावेळी संकल्प मेळाव्याच्या संयोजक दीपक कांबळे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार समाजाभिमुख करण्या साठी आणि सामाजिक चळवळ गतिमान करण्यासाठी रामदास आठवले आणि पप्पू कागदे यांच्या नेतृत्वा खाली काम करीत आहोत.उपेक्षित आणि बहुजन समाजालान्याय मिळून देण्यासाठी काम करीत असल्याचा देखील त्यांनी उल्लेख केला.तसेच गायरान जमिनी,स्मशानभूमी, घरकुल आणि विविध सरकारी योजना यात कुणाची अडवणूक होत असेल तर त्यासाठी आम्ही अहोरात्र संघर्ष करून समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम कार्यकर्त्यांच्या माध्यमातून करीत असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

संकल्प मेळावा यशस्वी करण्यासाठी गौतम बचुटे,दिलीप बनसोडे, ईश्वर सोनवणे,विकास मस्के,रमेश निशिगंध, निलेश ढोबळे,राजेश सोनवणे,सुरज काळे, बाळासाहेब ओव्हाळ, प्रशांत हजारे,अनिता वाघमारे,सुरेखा गायकवाड,सरस्वती शिनगारे,विकास आरकडे,भारत गायकवाड,मिलिंद भालेराव,कैलास जावळे,हरीश गायकवाड,दादाराव धेंडे,अंबादास तुपारे, रुपचंद ढालमारे, इब्राहिम इनामदार, शेख मौला,जयपाल रोकडे,प्रदिप शिनगारे, नितीन घोडके,हरेंद्र धीरे,डॉ.चत्रभुज हिरवे, मसु बचुटे,विनोद गायकवाड,रवींद्र तुपारे, संभाजी हजारे,विनोद शिंदे,रोहित बचुटे, राहुल बचुटे आदींनी केले आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिलीप बनसोडे यांनी तर आभार गौतम बचुटे यांनी मानले.

# 'एक वही, एक पेन' उपक्रमास उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांचा उत्साहवर्धक प्रतिसाद

## गणेशोत्सवात समाजातील गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे सहकार्य

**मुंबई । प्रतिनिधी**

समाजातील गरजू व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य पुरविण्यासाठी सुरू असलेल्या 'एक वही, एक पेन' या उपक्रमास विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोलाचा हातभार लावला आहे.गणेशोत्सवाच्या निमित्ताने हारफुलांसह शैक्षणिक साहित्य श्री गणेशचरणी अर्पण करून वंचित विद्यार्थ्यांना मदत करण्याचा संदेश या अभियानातून दिला जातो. या उपक्रमाच्या शिष्टमंडळाने, प्रणेते पत्रकार राजू झनके यांच्या नेतृत्वाखाली, डॉ. गोऱ्हे यांच्या शासकीय निवासस्थानी भेट दिली.मागील दहा वर्षांत हजारो विद्यार्थ्यांना मदत पोहोचविणाऱ्या या अभियानाचे डॉ. गोऱ्हे यांनी कौतुक करत



शिक्षणापासून कोणताही घटक वंचित राहू नये, यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डॉ. गोऱ्हे यांनी स्वतः शैक्षणिक साहित्य देऊन सहभाग नोंदवला तसेच समाजालाही आवाहन केले की, गणेशोत्सवात हारफुलांसह शैक्षणिक साहित्य अर्पण करून वंचित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावा.या भेटीत शिष्टमंडळात अविनाश गरुड, राजेश उबाळे, राजू लोखंडे, सुनील वाकोडे, पत्रकार काशिनाथ म्हादे, सुरेश ठमके आदी मान्यवर उपस्थित होते.

# रोडपाली ठाकूरवाडी फुडलँड कंपनीच्या समोर रस्त्याची अतिशय दुरावस्था झाल्याने नागरीक त्रस्त

## दलीत पँथर रायगड जिल्हा अध्यक्ष मनोज गायकवाड यांचे

**पनवेल । प्रतिनिधी**

रोडपाली ठाकूरवाडी फुडलँड कंपनीच्या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असल्याने वाहनधारकांना तारेवरची कसरत करत जीवघेणा प्रवास करावा लागत होता. संबंधित विभागाने वेळीच लक्ष घालून रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी दलीत पँथर संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष मनोज गायकवाड यांनी केली असता संबधित अधिकारी वर्गाने तातडीने लक्ष वेधून काम पूर्ण केले आहे





या रस्त्याची दुरावस्था झाली असून अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत होते . या मार्गावरील गावातील नागरीकांना उद्योग, व्यवसाय, शाळा, नोकरी, रुग्णालय महाविद्यालयीन शिक्षणासाठी नागरीकांना समस्त ग्रामस्थांना रोज प्रवास करावा लागत होता. अशा या खड्डेमय झालेल्या रस्तावरुन जीव मुठीत घेत जीवघेणा प्रवास करावे लागत असून रात्रीच्या वेळी खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने सातत्याने अपघात होत आहेत. राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब पडवळ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष घनश्याम भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली दलीत पँथर संघटनेकडे मागणी करत रायगड जिल्हा अध्यक्ष मनोज गायकवाड यांनी मागणी पुर्ण केले आहे.

# मराठी वृत्तपत्र लेखक संघ या संस्थेच्या कार्यालयासाठी मी प्रयत्नशील राहीन; खा.नारायण राणे यांचे आश्वासन

**मुंबई । प्रतिनिधी**

सार्वजनिक जीवनात व राजकारणात काम करतांना मला मिळालेल्या पदांना मी न्याय देण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री असतांना राज्यात व देशात मला जो नावलौकिक मिळाला, त्यामागे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हा निर्णय होता, हे मला सांगतांना आजही अभिमान वाटतो. मला दिलेल्या संधीचा उपयोग मी नेहमीच जनतेच्या कल्याणाकरिता सामाजिक, शैक्षणिक व विधायक कामांसाठी केला. या काळात कोकणचा खूप विकास झाला, आताही होत आहे, पुढेही होत राहील, असे सांगतांनाच खासदार नारायण राणे यांनी मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या कार्यालयासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करीन, असे आश्वासन दिले. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने आयोजित वृत्तपत्र लेखक दिनाच्या कार्यक्रमात ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त रवींद्र मालुसरे यांनी संपादित केलेल्या 'प्रेरक शिल्पकार' या ग्रंथाचे आणि वृत्तपत्र लेखकांनी सोशल मीडियावर मुक्तपणे आणि निर्भीडपणे व्यक्त व्हावे यासाठी बनविलेल्या 'जागल्यांचा लोकजागर' या ब्लॉगरचे प्रकाशन नारायण राणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलतांना नारायण राणे पुढे असेही म्हणाले की, जीवनात यशस्वी होण्यासाठी आणि उच्च पदावर पोहोचण्यासाठी अल्पसंतुष्ट न राहता सतत संघर्ष केला पाहिजे. मळलेल्या वाटेने जाण्यापेक्षा यशस्वी झालेल्यांपासून स्फूर्ती घेऊन कोकणातील युवकांनी पुढे जायला हवे. आयएएस आणि आयपीएस चे प्रमाण अत्यल्प आहे ते भविष्यात वाढायला हवे. त्यासाठी लागणारी संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी मी तयार आहे. मुलांनी उच्च शिक्षित व्हावे यासाठी मी सिंधुदुर्गात मेडिकल, इंजिनिअरिंग कॉलेज काढले आहे. त्याची गुणवत्ता आता दिसत आहे. यापुढे आर्किटेक्ट असो किंवा अन्य कुणीही त्यांनी आयुष्यातील अपयशाच्या तक्रारीचा सूर न लावता आपली चाकोरी सोडून बाहेर पडायला पाहिजे तरच अधिक पैसे आणि नावलौकिक मिळेल.

देशाच्या तिजोरीत मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असलेले शहर ३४ टक्के हिस्सा उचलते. याचा विचार मुंबई लगत असणाऱ्या कोकणी माणसांनी केला पाहिजे. कोकण हे समृद्ध बनले पाहिजे. मला राज्यात व



केंद्रात जी-जी पदे मिळाली, त्याचा उपयोग मी महाराष्ट्राच्या व सिंधुदुर्ग जिल्ह्यात विकासासाठी केला, हे सांगतांना मला अभिमान वाटतो. कोकणाच्या विकासाची अशी चर्चा होते, त्यामध्ये माझ्या नावाचाही उल्लेख होतो. त्याचे सर्व श्रेय मी कोकणी माणसालाच देतो. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या कार्यालयीन जागेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मी सरकारमध्ये असल्याने तुमच्या या मागणीसाठी मी संबंधितांसाठी बोलून तुमचा प्रश्न सोडवायचा प्रयत्न करीन, असे आश्वासनही नारायण राणे यांनी सर्व ज्येष्ठ वृत्तपत्र लेखकांना दिले.

संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, मराठी वृत्तपत्र लेखक संघाचा वर्धापन दिन हा दिवस आम्हा वृत्तपत्र लेखकांसाठी उत्साहाचा आणि आनंदाचा असतो. नारायण राणे बेस्टचे चेअरमन असतांना शिंदेवाडी येथील संघाच्या कार्यालयात आले होते. इतके जुने ऋणानुबंध आमचे त्यांच्याशी आहेत. आज हा कार्यक्रम नारायण राणे यांची आठवण म्हणून त्याठिकाणी झाला असता, परंतु तेच कार्यालय आमच्याकडून महापालिकेने काढून घेतले आहे. अमृत महोत्सवी वाटचाल करझणारी ही चळवळ निरंतर सुरु राहावी यासाठी नारायण राणे यांनी सरकारदरबारी आमच्यासाठी प्रयत्न करावा व मराठी माणसांच्या या संस्थेसाठी जीवदान द्यावे.

यावेळी संघाचे माजी अध्यक्ष मधू शिरोडकर, वि अ सावंत, विजय ना कदम, मनोहर साळवी यांच्यासह मधुकर कुबल, रमेश सांगळे, नितीन कदम, दिगंबर चव्हाण, सुनील कुवरे, राजन देसाई, श्रीनिवास डोंगरे, दिलीप ल सावंत, कृष्णा काजरोळकर,सतीश भोसले, एस एम बी न्यूज चॅनेल्स अँड प्रिंट मीडियाचे अशोक सावंत आदी पदाधिकारी आणि ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक उपस्थित होते.

# धोंदलगाव येथे शिवना-टाकळी प्रकल्पावरील महत्त्वाची बैठक

## शेतकऱ्यांचा मोबदला आणि कालव्याचे उर्वरित काम तातडीने करण्याची मागणी

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर मतदारसंघातील धोंदलगाव येथे शिवना-टाकळी मध्यम प्रकल्पासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत प्रामुख्याने कालव्याचे अपूर्ण काम, चारीचे काम तसेच भूसंपादित जमिनींच्या मोबदल्याच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शेतकऱ्यांनी प्रकल्पांतर्गत संपादित झालेल्या जमिनींचा मोबदला तातडीने देण्यात यावा, अशी ठोस मागणी बैठकीत मांडली. तसेच ज्यांची थोड्या प्रमाणात जमीन संपादित झाली आहे, त्यांच्या क्षेत्राची अचूक मोजणी करण्याचीही गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले.कालव्याचे व चारीचे अपूर्ण काम



लवकरात लवकर गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यात यावे, अशी अपेक्षा बैठकीतून व्यक्त झाली. पिकांना वेळेवर पाणी उपलब्ध व्हावे यासाठी उजव्या व डाव्या कालव्यावरील चारीचे काम तातडीने हाती घ्यावे, असे निर्देश गुत्तेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

शेतकऱ्यांनी मांडलेल्या समस्या संबंधितांनी गांभीर्याने ऐकून घेतल्या असून, त्यांच्या त्वरित निराकरणासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील, असे आश्वासन बैठकीत देण्यात आले.शिवना-टाकळी मध्यम प्रकल्प हा वैजापूर तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडीत महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे पाणी शेवटपर्यंत म्हणजेच बोर-दहेगावपर्यंत पोहोचावे, यासाठी शासनाने योग्य उपाययोजना कराव्यात, अशी एकमुखी मागणी बैठकीतून करण्यात आली. धोंदलगाव येथे पार पडलेली ही बैठक शेतकऱ्यांच्या हक्काच्या प्रश्नांवर ठोस दिशा दाखवणारी ठरली असून, प्रकल्पाच्या गतीसाठी आणि शेतीच्या शाश्वत विकासासाठी ती ऐतिहासिक ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# राजकारणापेक्षा विकास कामांना जास्त महत्त्व-सुजित झावरे पाटील

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

वडझिरे (ता. पारनेर) येथे स्व. दत्तात्रय मारुती सुरुडे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त स्मशानभूमी सुशोभीकरणाच्या कामाचे भूमिपूजन जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते पार पडले. स्व. माजी आमदार वसंतराव झावरे पाटील यांचे खंदे सहकारी असलेल्या स्व. दत्तात्रय सुरुडे यांच्या स्मरणार्थ हे कार्य हाती घेण्यात आले असून, यामुळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे.

भूमिपूजन प्रसंगी बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले, मला राजकारणात कुणाशीही स्पर्धा करायची नाही. माझी खरी स्पर्धा ही विकासाशी आहे. पारनेर तालुक्याच्या विकासासाठी आणि जनतेच्या प्रश्नांवर उपाय शोधत गावागावात ठोस काम करणे हेच माझे ध्येय आहे. लोकांचे मन जिंकायचे असेल तर आश्वासनं देऊन न थांबता प्रत्यक्ष काम करून दाखवावे लागते, आणि आम्ही तेच करत आहोत.



ते पुढे म्हणाले की, स्व. दत्तात्रय सुरुडे यांनी आयुष्यभर स्व. मा. आ. वसंतराव झावरे पाटील यांना साथ देत वडझिरे गावाच्या विकासासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यांच्या निष्ठा आणि कार्यातून प्रेरणा घेत मी हे विकासकाम त्यांच्या स्मरणार्थ समर्पित करीत आहे.सुजित झावरे पाटील यांनी दिलेले आश्वासन केवळ शब्दांपुरते मर्यादित न ठेवता, प्रत्यक्ष कामाला सुरुवात करून आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांना अप्रत्यक्ष संदेश दिला. केवळ टीका-टिप्पणी करणाऱ्यांपेक्षा विकासाच्या आघाडीवर प्रत्यक्ष उभे राहणारे नेतृत्वच लोकांचा विश्वास संपादन करू शकते, असा संदेश या भूमिपूजनातून दिसून आला.

कार्यक्रमाला अरुणराव ठाणगे, बाळासाहेब रेपाळे, सतीश पिंपरकर, सरपंच ऋषी दिघे, सोपान करंडे, शिवाजी औटी, राजाराम एरंडे, बाळासाहेब दिघे, मोहन चौधरी, विवेक मोरे, सुभाष सुरुडे, डॉ. श्रीमंत दिलपकर, अनिकेत एरंडे, डॉ. गणेश चौधरी, सचिन करकंडे, संतोष दिघे, पोपटराव शेटे, बाबाजी करकंडे, सोमनाथ दिघे, दिगंबर भालेराव, शुभम निघूट, निलेश बोरकर, संभाजी मोरे, संतोष रोकडे यांच्यासह मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुसळधार पावसातही संत रामपालजी महाराजांच्या सत्संगाला भाविकांची प्रचंड गर्दी


**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिनांक २४ ऑगस्ट, २०२५ रोजी नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या गुजरात राज्यातील आश्रावा येथे संत रामपाल जी महाराजांच्या जिल्हा सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते. मुसळधार पाऊस कोसळत असतानाही नंदुरबार जिल्ह्यातील शेकडो भाविकांनी या सत्संगाला प्रचंड गर्दी केली. या सत्संगाला नवापूर, नंदुरबार,तळोदा, अक्कलकुवा, शहादा आणि धडगाव या तालुक्यांमधून मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होते. जोरदार पाऊस असूनही त्यांच्या उत्साहात कोणतीही घट दिसून आली नाही. पाऊस सुरू असतांनाही मोठ्या उत्साहात सर्वजण गणपती ट्रस्टच्या बाजूला असलेल्या हॉलमध्ये एकत्र जमले. सर्व भक्तांनी शिस्तबद्ध पद्धतीने सत्संग ऐकून घेतला. सत्संगानंतर त्यांना चहा बिस्किट सर्वांना शिस्तबद्ध पद्धतीने देण्यात आले. या कार्यक्रमात अनेक भक्तांनी स्वेच्छेने विविध सेवा दिल्या. यात चप्पल-बूट सेवा, आलेल्या भाविकांना रस्ता दाखवणे आणि पावसापासून बचावासाठी छत्री देणे अशा अनेक सेवांचा समावेश होता. यासोबतच, सत्संगाशी संबंधित पुस्तकांचे वितरण आणि उपस्थित भक्तांची नोंदणी करण्याची सेवाही सुरू होती. या सत्संगात चारों युग में मेरे संत पुकारे, कूक कहा हम हेल रे। हीरे माणिक मोती बर्षे, यह जग चुगता ढेल रे।। या दोह्याच्या माध्यमातून संत रामपाल जी महाराज यांनी अज्ञानी आणि दिशाहीन भक्तांची अवस्था स्पष्ट केली आहे. हिरे माणिक मोती बर्षे याचा अर्थ त्यांनी सांगितलं की, सतगुरू (खरे संत) आपल्या प्रवचनातून आणि ज्ञानाने हिरे, माणिक आणि मोत्यांसारखे अनमोल ज्ञान देत आहेत. हे ज्ञान आत्मिक उन्नतीसाठी आणि मोक्षासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. पण यह जग चुगता ढेल रे याचा अर्थ असा आहे की, या जगातले लोक (अज्ञानी भक्त) त्या अनमोल ज्ञानाकडे दुर्लक्ष करून मातीच्या



ढेकळांसारख्या (निरुपयोगी) गोष्टी गोळा करत आहेत. याचाच अर्थ, लोक खऱ्या अध्यात्मिक ज्ञानाकडे न वळता, चुकीच्या धार्मिक कर्मकांडांमध्ये आणि निरर्थक पूजा-अर्चांमध्ये अडकले आहेत. त्यांना खऱ्या ज्ञानाची किंमत समजत नाही. मैं रोवत हूँ सृष्टि को, सृष्टि रोवे मोहे । गरीब दास इस वियोग को समझ न सकता कोय ।। ते म्हणाले की या दोह्यात संत गरीबदासजी यांनी आत्मा आणि परमात्मा यांच्यातील विरहाचे दुःख व्यक्त केले आहे. मैं रोवत हूँ सृष्टि को याचा अर्थ आहे की, संत या जगातील सर्व जीवांचे दुःख पाहून रडत आहेत. जीवात्मा आपल्या मूळ घरापासून (परमात्म्यापासून) दूर झाल्यामुळे या संसारात दुःखात आहे, हे पाहून त्यांना वेदना होत आहेत. त्याच वेळी, सृष्टि रोवे मोहे याचा अर्थ असा आहे की, ही संपूर्ण सृष्टी किंवा जगातील लोक संतांच्या या दुःखात त्यांच्यासोबत रडत आहेत. यामागचे कारण असे आहे की, त्यांनाही कळत नाहीये की ते कोणत्या दुःखात अडकले आहेत. या दुःखाचे मूळ कारण म्हणजे आत्मा आणि परमात्मा यांच्यातील विरह आहे. गरीब दास इस वियोग को समझ न सकता कोय या ओळीतून संत सांगतात की, हा विरह आणि त्यातून निर्माण होणारी वेदना किती खोल आहे, हे कोणीही समजू शकत नाही. हा विरह फक्त संतांनाच जाणवतो, कारण त्यांना सत्य आणि परमज्ञान प्राप्त झाले आहे. या दोन्ही दोह्यांतून संत रामपाल जी महाराज यांनी खऱ्या ज्ञानाचे महत्त्व आणि आत्मिक जागृतीची गरज समजावून सांगितली आहे.

# शहादा येथे श्री चक्रधर स्वामींच्या अवतार दिनानिमित्त भव्य शोभायात्रा





**नंदुरबार । दिपक गोसावी**

सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी की जय... च्या जयघोषात शहादा तालुक्यातील ब्राह्मणपुरी गावात श्री चक्रधर स्वामींच्या अवतार दिनानिमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत संत-महंत आणि हजारो भाविक मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.या कार्यक्रमाचे आयोजन ब्राह्मणपुरी ग्रामस्थ, सर्वज्ञोपासक मंडळी आणि जय श्री कृष्ण महानुभाव परिषद, धुळे-नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. शोभायात्रेची सुरुवात येथील श्रीकृष्ण मंदिर आणि श्री दत्त मंदिरातून झाली. यावेळी महंत सुनील दादा भोजने (समशेरपूर) आणि अंकिता बाई अंकुळनेरकर यांच्यासह अनेक संत-महंत उपस्थित होते.शोभायात्रेदरम्यान पालखीत श्री मूर्ती ठेवून पूजाअर्चा करण्यात आली. यात्रेच्या स्वागतासाठी जागोजागी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. रिमझिम पावसामुळे उत्साह आणखी वाढला होता आणि भाविक भजनात तल्लीन होऊन गरबा आणि नृत्य करत होते. यात्रेत हजारो महिला आणि युवक-युवती शिस्तबद्धपणे सहभागी झाले होते. शोभायात्रेचा समारोप दिगंबर भाई पाटील यांच्या निवासस्थानी झाला.

शोभायात्रेपूर्वी सकाळी श्रीकृष्ण मंदिर आणि श्री दत्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. यामध्ये श्रीमूर्ती अभिषेक, अर्चनविधी, श्रीमदभगवतगीता आणि श्री चक्रधरोक्त सुत्र पठण, तसेच श्री पंचकृष्ण पूजन यांचा समावेश होता. हे सर्व कार्यक्रम संत-महंत आणि भाविक भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाले.ब्राह्मणपुरी येथील मित्तल जिनिंगमध्ये मंगळवारी (ता. २६) सकाळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९:३० वाजता आचार्यप्रवर श्री मोठे बाबाजी अंकुळनेरकर यांच्या अध्यक्षतेखाली धर्मसभा होणार आहे. यामध्ये धर्मकार्य अभिष्टचिंतक श्री भास्कर बाबाजी महानुभाव यांच्यासह अनेक प्रतिष्ठित आचार्य, संत, महंत, तपस्विनी आणि भाविक उपस्थित राहणार आहेत. जय श्रीकृष्ण महानुभाव परिषद ट्रस्ट, शहादा, नंदुरबार, धुळे जिल्हा, सर्व सर्वज्ञोपासक सदभक्त, आणि समस्त ग्रामस्थ ब्राह्मणपुरी यांनी सर्वांना या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील करोडोचा भ्रष्टाचार-कृष्ण पाटोळे

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या प्रकरणी अमर उपोषण सुरू

**बीड । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचाराचा हा प्रकरण अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. योजनेअंतर्गत फळबाग लागवडीतून मोठ्या प्रमाणात अनियमितता घटित झाल्याच्या तक्रारींची चौकशी होत नसल्याचे दिसते. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्याचा निर्णय हा त्या लोकांच्या दुर्दशेबद्दलचा प्रतिघात आहे, ज्यांना या योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदतीची अपेक्षा होती.या प्रकरणात, चौकशी समितीला दबाव आणण्यात आले असल्याची तक्रार देखील आहे, ज्यामुळे चौकशी प्रक्रियेला अपाय झाला आहे. विशेषतः, संबंधित अधिकाऱ्यांनी तोंडी नकार दिला आहे, जेणेकरून हे प्रकरण दबवले जाईल. हे सर्व उपाययोजना आणि गटविकास अधिकाऱ्यांचे आदेश यांचे उल्लंघन आहे, ज्यामुळे भ्रष्टाचाराची संधी वाढली आहे.यामध्ये पुढील मुद्दे लक्षात घेणे आवश्यक आहे. चौकशी समितीतील सदस्यांनी चौकशी न करण्याचा निर्णय घेतल्यास, त्यांच्यावर कार्यवाही केली




पाहिजे.राजकीय दबावामुळे असे वाटते की अधिकारी व कर्मचारी तक्रारदारांना गप करायला प्रवृत्त करीत आहेत, ज्यामुळे न्याय मिळविण्यात अडथळा,गटविकास अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडून तात्काळ कारवाईची आवश्यकता आहे. अन्यथा, उपोषणामुळे जनतेमध्ये असंतोष वाढू शकतो.सुरक्षेचा प्रश्न तक्रारदाराच्या सुरक्षिततेचा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना या प्रकरणाची गंभीरतेने घेतले पाहिजे.योजना प्रभावीपणे कार्यान्वित व्हावी आणि लाभार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ आणि ठोस निर्णय घेतले पाहिजेत.

# नायगाव येथे बैलपोळा सण उत्साहात साजरा

## मांजरा धरण भरल्याने शेतकऱ्यांच्या आनंदाला उधाण

**केज । प्रतिनिधी**

बैलपोळा हा शेतकऱ्यांचा खास आणि महत्त्वाचा सण आहे.शेतामध्ये राबणाऱ्या बैलांच्या सन्मानासाठी हा सण साजरा केला जातो. वर्षभर शेतात मेहनत करणाऱ्या बैलांना या दिवशी विश्रांती देऊन प्रत्यक्ष आपल्या बैला प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा मोठ्या आनंदाने व उत्साहाने शेतकरी श्रावण महिन्यात अमावस्याला हा सण प्रतिवर्षी साजरा केला जातो.त्याचप्रमाणे केज तालुक्यातील नायगाव येथे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी बैलआपला पोशिंदा आहे.त्यांचा मान राखण्यासाठी हा सण मोठ्या कृतज्ञतेने व आनंदाने नायगांव साजरा करण्यात आला



केजतालुक्यात असलेले मांजरा धरण काठोकाठ भरलेले असल्याने या वर्षीच्या बैलपोळ्याचा आनंद शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. आता दोन वर्ष पाणी शेतीसाठी पुरणार आहे त्यामुळे शेतकरी आनंदोत्सव करत पोळा सण साजरा करत आहे असे नायगाव येथील रहिवासी प्रमाणीत लेखा परीक्षक श्री. चत्रभुज खोडसे यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# अखेर वाढीव टप्पा अनुदानाचा शासनादेश निर्गमित

## विना अनुदानित शाळा कृती समिती बीड जिल्ह्याच्या वतीने शासनाचे आभार

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाने राज्यातील विना अनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान पावसाळी अधिवेशनात मंजूर केल्यानंतर त्या संदर्भातला शासनादेश अखेर आज सोमवार दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७:३६ सुमारास निर्गमित करून विना अनुदानित शाळेच्या वाढीव टप्पा अनुदानाच्या प्रश्न मार्गी लागला. त्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचे विनाअनुदानित शाळा कृती समिती बीड जिल्हा शाखेच्या वतीने वैजनाथ चाटे, जितेंद्र डोंगरे, जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी जाहीर आभार मानले.

राज्यातील विना अनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान मिळावे या मागणीसाठी सातत्याने शिक्षक संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येत होते. आंदोलनाच्या मागणीचा पाठपुरावा करत असताना ८ आणि ९ जुलै रोजी शिक्षक समन्वय संघाच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानात मोठे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आंदोलनाची दखल घेतली. तसेच सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनामध्येच वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करून असे आश्वासन दिले. नुसता आश्वासन देऊन मुख्यमंत्री थांबले नाहीत तर मुख्यमंत्र्यांनी दुसऱ्याच दिवशी म्हणजेच ९ जुलै रोजी वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या निधीची घोषणा केली. केवळ घोषणा करून सरकार थांबले नाही. तर यावेळी वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या ९७० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली. शिवाय ०१ ऑगस्ट २०२५ रोजी पासून प्रत्येक शिक्षकांच्या खात्यात वाढीव टप्प्याचा पगार देणार असल्याचे आश्वासन दिले. परंतु अधिवेशन संपून महिना दीड महिना झाला तरी शासन आदेश निर्गमित झाला होत नसल्याने शिक्षण समन्वय संघाच्या वतीने मंत्रालय स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला. 'बोले तैसे चाले' या म्हणीप्रमाणे राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी शासनादेश निर्गमित करण्यासंदर्भात प्रशासनाला आदेश दिले. त्यानंतर शासन आदेश निर्गमित करण्यासाठी हालचाली सुरू केल्या. अखेर आज सोमवार दिनांक २५ रोजी सायंकाळी ७:३६ वाजण्याच्या सुमारास वाढीव टप्पा अनुदानाचा शासन आदेश निर्गमित केला. शासन आदेश निर्गमित होताच महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती बीड जिल्हा शाखेच्या वैजिनाथ चाटे, जितेंद्र डोंगरे, लक्ष्मण जगताप, विजयसिंह शिंदे, मुक्ताताई मोटे-अर्दड मॅडम, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, रामदास जामकर, शेख सर,बाळासाहेब नागरगोजे, रवींद्र भुक्कन, जावेद पठाण, दिपक गरुड, चंद्रशेखर तौर, अंकुश गवळी, प्रताप पवार, भागवत यादव, अशोक मोरे, सुरेश कदम यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी वतीने आनंद साजरा करून शासनाचे आभार मानले.

# पुणे ते कोल्हापूर महामार्गावर टोलवसुली बंद करा:राजू शेट्टी

**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी पुणे बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर पुण्यापासून कोल्हापूर आणि कागल ते बेळगाव हद्दीत टोल वसुली बंद करण्यासाठी कायदेशीर नोटीस राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला पाठवली आहे. येत्या आठवडाभरात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याबाबत कार्यवाही न केल्यास पुढील आठवड्यात अवमान याचिका दाखल करणार असल्याचे राजू शेट्टी यांनी म्हटले आहे.राजू शेट्टी म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पुणे ते कोल्हापूर व कागल ते बेळगाव या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावर वाहनधारकाकडून टोल वसूली करता येणार नाही. काल याबाबत मी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना तातडीने या दोन्ही महामार्गावरील टोल बंद करण्यात यावे याबाबत कायदेशीर मार्गाने नोटीस दिली आहे. येत्या आठवड्याभरात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याबाबत कार्यवाही न केल्यास पुढील आठवड्यात अवमान याचिका दाखल करणार असल्याचे शेट्टी यांनी म्हटले आहे.दरम्यान, केरळमधील पलियाक्कारा टोल नाक्यावरील टोलवसुली स्थगित करण्याच्या केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. हा आदेश राष्ट्रीय महामार्ग ५४४ च्या एडापल्ली-मनुथी भागाच्या खराब अवस्थेमुळे देण्यात आला होता. मुख्य न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने सोमवारी सुनावणी घेतल्यानंतर हा निर्णय दिला. याच पार्श्वभूमीवर राजू शेट्टी यांनी पुणे ते कोल्हापूर आणि कागल ते बेळगाव या महामार्गावरील टोल बंद करण्यात यावे अशी मागणी केली आहे.सर्वोच्च न्यायालयाने रस्त्याच्या खराब स्थितीबद्दल एनएचएआयवर कठोर टीका केली. अलीकडेच याच रस्त्यावर १२ तास वाहतूक कोंडी झाली होती. मंगळवारी निकाल देताना खंडपीठाने एनएचएआयच्या दोन्ही याचिका फेटाळून लावल्याचे स्पष्ट केले. एखाद्या व्यक्तीला रस्त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यासाठी १२ तास लागतात तर १५० रुपये का द्यावे? ज्या रस्त्याला एक तास लागण्याची अपेक्षा आहे, त्याला आणखी ११ तास लागतात आणि त्यांना टोलही भरावा लागतो! असे सरन्यायाधीश गवई यांनी म्हटले आहे.न्यायमूर्ती विनोद चंद्रन यांनी या मार्गावरील वाहतूक कोंडीच्या माध्यमांच्या वृत्तांचा संदर्भ दिला आणि सांगितले की दोन्ही न्यायमूर्तींनी वैयक्तिकरित्या या मार्गावर कोंडीचा अनुभव घेतला आहे. गवई यांनी टिप्पणी केली की राष्ट्रीय महामार्गांवरील गटारे, खड्डे आणि वारंवार होणारी वाहतूक कोंडी ही अकार्यक्षमतेची चिन्हे आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077